पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी-३९
जा.क्र.इक्षेका/४/कावि/२३/२०१५
दि. २८/०१ /२०१५

प्रति,
मा.----------------------------
सदस्य/सदस्या
इ प्रभाग समिती

**विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ०४/ ०२ /२०१५ रोजी दु. ३.०० वाजता आयोजित केलेबाबत.**

**महोदय / महोदया,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक **०४/ ०२ /२०१५** रोजी दु. ३.०० वाजता इ क्षेत्रीय कार्यालयाचे “**संत ज्ञानेश्वर महाराज**” सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती

प्रत- १. सर्व संबंधित शाखाप्रमुख
२. कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग समिती
कार्यपत्रिका क्रमांक - ११

दिनांक- **०४/ ०२ /२०१५** रोजी दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक **०४/ ०२/२०१५** रोजी दुपारी ३.०० वाजता इ क्षेत्रीय कार्यालयातील **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

अ) दिनांक ०७/१/२०१५ तहकूब सभा दि. १७/१/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका क्र. १०) सभावृत्तांत कायम करणे.

**विषय क्र. १** पिंपरी चिंचवड महानगरपलिकेच्या इ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात प्रभाग क्र. ६,७ व २९ ते ३६ असे एकूण १० प्रभागाचा समावेश आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ९ सप्टेंबर २०१३च्या आदेशानुसार राज्याच्या नागरी भागातील फेरीवाल्यांच्या संदर्भात् राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ लागू करणेच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही/उपाययोजना करणे संबंधी आदेश दिलेले आहेत.त्याप्रमाणे केंद्रशासन राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ लागू करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही/उपाययोजना करणे संदर्भात महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.राकेधो/२०१३/पक्र.३९/नवि/ ३४२९/ १०/२०१३ अन्वये कळविले आहे. मा.कार्यकारी अभियंता स्थापत्य इ क्षेत्रीय कार्यालय यांनी उपरोक्त प्रभागामध्ये हॉकर्स झोन निश्चित केले आहे. मा.सहा.आयुक्त, भूमि आणि जिंदगी विभाग यांचेकडील जा.क्र. भुजि/१/कावि/ २९३/ २०१४ दिनांक १७/११/२०१४ अन्वये झोन निश्चिती संदर्भात मा.प्रभाग समितीची मान्यता घेणेबाबत कळविले आहे. इ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात प्रस्तावित हॉकर्स झोन निश्चितीस मान्यता देणेबाबत.

------

मा.सभापती यांचे मान्यतेने ऐनवेळचे विषय घेणे.

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती

जा.क्र.इक्षेका/४/कावि/२३/२०१५
दि. २८/०१/२०१५